# प्रेसनोट दि. ०६/०९/२०१८

## औंध येथील स्पा मसाज सेंटरवर छापा

### ४ सज्ञान मुलींची वेश्या व्यवसायतुन सुटका

### स्पा मॅनेजर अटकेत

दि.०५/०९/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. मनिषा झेंडे, यांना पोलीस नाईक नितीन लोंढे यांचे कडुन माहीती मिळाली की, "एव्हीझेड स्पा आणि स्कीन केअर" फ्लॅट नंबर ४ सिताईपार्क, बी बिल्डींग, डिपीरोड औंध पुणे. येथील मसाज सेंटरमध्ये इसम नामे अशुली लोहे हा मसाज पार्लर मध्ये ठेवलेल्या थेरपीस्ट महिलांचेकडुन मसाजचे नावाखाली वेश्या व्यवसाय करुन घेत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली. त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ. मनिषा झेंडे व विभागाकडील अधिकारी, कर्मचारी तसेच चतुश्रृंगी पोलीस स्टेशनकडील पोलीस निरीक्षक (गुन्हे) वैशाली गलांडे यांनी संयुक्त कारवाई करून औंध परिसरातील "एव्हीझेड स्पा आणि स्कीन केअर" फ्लॅट नंबर ४ सिताईपार्क, बी बिल्डींग, डिपीरोड औंध पुणे.येथे चालत असलेल्या स्पा मसाज सेंटरमध्ये वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला. छाप्या दरम्यान १ दिल्ली व महाराष्ट्रातील ३ अशा एकुण ४ सज्ञान मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन त्यांना वेश्या व्यवसायास लावणारा अशुली लोहे वय २७ वर्षे रा. ए-३/१७, रक्षालेखा सोसायटी, कोरेगाव पार्क, पुणे मुळगाव रोबवे सोलेफे, तहसील सेनापती, मनिपुर राज्य याचे विरुध्द चतुश्रृंगी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३९९/२०१८ इटपा ॲक्ट कलम ३,४,५. सह भादंवि कलम ३७०, ३७० अ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी अशुली लोहे यास कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. ५०००/- रुपये, ४ मोबाईल फोन, व इतर मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री. सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२,यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे, पोउनि आनंत व्यवहारे,पोउनि योगिता कुदळे, नितीन लोंढे, नरेश बलसाने, ज्ञानेश्वर देवकर, राजाराम घोगरे, नामदेव शेलार, नितिन तरटे, कविता नलावडे, गीतांजली जाधव, रुपाली चांदगुडे, सुनिल नाईक,राजेद्र ननावरे यांनी व चतुश्रृंगी पोलीस स्टेशनकडील पोलीस निरीक्षक (गुन्हे) वैशाली गलांडे व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.